## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई-४०० ७०३

परिपत्रक क्रमांक उमाप/दिनांक २६/०२/२००८

विषय :- फेब्रुवारी/मार्च-२००८ मध्ये होणा-या उच्च माध्यमिक व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा : दृष्टिहीन, अल्पदृष्टि आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सीने बाधित झालेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी लेखनिक व जादा वेळ देण्याबाबत.

संदर्भ :- १. अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे क्रमांक अकआ/प्र-७/मार्गदर्शन/०७-०८/२९३, दिनांक २१/०२/२००८ चे या कार्यालयास दि. २५/०२/२००८ रोजी प्राप्त झालेले पत्र.
२. राज्य मंडळाचे क्र.रामं/परीक्षा-५/१५४९, दिनांक २६/०२/२००८ चे पत्र.

मा. आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांच्याकडून प्राप्त झालेल्या सविस्तर सूचनांच्या आधारे आपणास कळविण्यात येते की फेब्रुवारी/मार्च-२००८ मध्ये होणा-या उच्च माध्यमिक व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस दृष्टिहीन, अल्पदृष्टि आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सीने बाधित झालेल्या विद्यार्थ्यांसाठी खालील नमूद केलेल्या सवलती देण्याबाबत कळविण्यात येत आहे.

१. परीक्षेसाठी 'जादा' वेळ देणे:-लेखी परीक्षा एक तासाची असल्यास त्यासाठी किमान २० मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यात यावा. त्याचप्रमाणे परीक्षेचा कालावधी एक तासापेक्षा अधिक असल्यास अतिरिक्त वेळ देताना प्रत्येक तासाला २० मिनिटे अतिरिक्त वेळ याप्रमाणे गणना करावी.
२. परीक्षेसाठी लेखनिक देणे:-परीक्षेसाठी सदर विद्यार्थ्यांना लेखनिक देताना उमेदवार एकाच शाळेचे असतील तर तो लेखनिक उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एक पायरी/टप्पा कमी असावा. मात्र लेखनिक व उमेदवार भिन्न शाळेचे असल्यास त्यास ही अट लागू राहणार नाही.
३. वेगवेगळ्या विषयांच्या पेपरसाठी एकापेक्षा अधिक लेखनिक वापरता येणार नाहीत. काही अपवादात्मक परिस्थितीत परीक्षा सुरू होणा-च्या ऐनवेळी लेखनिक बदलास मान्यता देण्याचे अधिकार केंद्रसंचालकाला राहतील. ऐनवेळी केंद्रसंचालकांनी अशी कार्यवाही केल्यास तातडीने या मंडळास कळवावी.

राज्य मंडळाच्या सूचनांप्रमाणे यापूर्वी देण्यात येणा-या सर्व सवलती [illegible] राहतील.

त्याप्रमाणे कार्यवाही तातडीने करण्यात यावी व सदरचे विद्यार्थी सवलतींपासून वंचित राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

(बसंती रॉय)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.

प्रति,
१. सर्व मान्यताप्राप्त शाळांचे/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य.
२. सर्व केंद्रसंचालक/परीरक्षक (मुंबई/ठाणे/रायगड)

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव :-
१. शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग
२. शिक्षणाधिकारी ठाणे/रायगड,
३. शिक्षण निरीक्षक मुंबई दक्षिण, उत्तर, पश्चिम.

प्रत माहितीस्तव सविनय सादर,
मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, ...